# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:18.01.2026** **वार:रविवार**

---

•ग्रँड टूर सायकल स्पर्धेसाठी पुणे जिल्ह्यात सज्जता. वाहतुकीच्या मार्गांमध्ये मोठे बदल. पुण्यातील मुख्य रस्त्यांवरील काही शाळांना सुटी जाहीर.

•मुंबईत पोलिसांसाठी ४५ हजार घरं बांधण्याचा राज्य

सरकारचा निर्णय.

•पुण्यात पीएम सेतू कार्यशाळेत शासकीय तंत्र निकेतनांना उद्योगांद्वारे व्यवस्थापित संस्था बनविण्यावर मंथनाचं आयोजन. आणि

•भारत-न्यूझीलंड दरम्यान आज इंदूर इथं पन्नास षटकांचा अंतिम सामना

**<u>सायकलिंग</u>**

पुणे ग्रँड चॅलेंज सायकलिंग स्पर्धेसाठी पुणे जिल्ह्यामध्ये सज्जता करण्यात आली आहे. उद्यापासून २३ तारखेपर्यंत जिल्ह्यातील ४३७ किलोमीटर मार्गावरून जगभरातील 35 संघांमधील 170 आणि भारताचे अ आणि ब संघातील सायकलपटू पुण्याचा नागरी परिसर, वारसा-संपन्न स्थळं आणि रमणीय ग्रामीण प्रदेशातून सायकल चालविण्याचं आव्हान एकंदर चार टप्प्यांमध्ये पार करणार आहेत.

या स्पर्धेत सहभागी सायकलपटूंचा स्वागत समारंभ आणि उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काल पुण्यात झालं. पुण्याचा सायकलींशी असलेला ऋणानुबंध १०० वर्षांहून अधिक जुना आहे. ही स्पर्धा पुण्याची 'सायकलचे शहर' ही ऐतिहासिक ओळख जागतिक स्तरावर पुन्हा एकदा प्रस्थापित करेल असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. प्रामुख्यानं परदेशी सायकलपटूंना समजावं म्हणून इंग्लिश भाषेत बोलताना ते म्हणाले...

यावेळी विविध देशातील सायकलपटूंचा सत्कार करण्यात आला.

विविध भाषा, देश आणि संस्कृतींचं प्रतिनिधित्व करणारे हे सायकलपटू भारतीय पारंपरिक वेशात मंचावर आले होते.

**<u>बाईट:</u>**

**<u>इंट्रो</u>**-

भारतीय संघातील दिल्लीहून आलेला एक सायकलपटू, अक्षर त्यागीनं, या स्पर्धेबद्दल आणि तयारीविषयी आकाशवाणीशी संवाद साधला...

पुणे ग्रँड टूर सायकल स्पर्धेच्या उद्या पुण्यातील टप्प्यामुळं फर्ग्युसन रस्ता, जंगली महाराज रस्ता, शहरातील मध्यभाग, तसंच स्पर्धा मार्गावरील शाळा-महाविद्यालायांना उद्या सुटी जाहीर करण्यात आली आहे. सोमवारी सकाळी नऊ ते सायंकाळी सहा दरम्यान स्पर्धा मार्ग, तसंच जोडणारे उपरस्ते वाहतुकीला बंद राहतील अशी माहिती सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा यांनी काल पत्रकार परिषदेत दिली. या मार्गांवरुन कामावर येणाऱ्या कर्मचाऱ्यांनी शक्यतो मेट्रो सेवेचा वापर करावा असं आवाहन पोलिसांनी केलं आहे.

**<u>मंत्रिमंडळनिर्णय</u>**

मुंबई शहर आणि उपनगरातील पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी सुमारे ४० ते ४५ हजार शासकीय निवासस्थानं उपलब्ध व्हावीत यादृष्टीनं 'मुंबई पोलीस हाऊसिंग टाऊनशिप प्रकल्प' राबविण्यास काल झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. या वसाहतीसाठी अंदाजे २० हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी ३० टक्के निधी शासन आणि ७० टक्के निधी शासन हमीद्वारे वित्तीय संस्थांकडून कर्ज स्वरुपात उभारला जाईल.

**<u>मंत्रिमंडळनिर्णय</u>**

पुणे महानगर क्षेत्रात केंद्र सरकारच्या पीएम-ई ड्राईव्ह योजनेंतर्गत एक हजार ईलेक्ट्रीक बस चालविण्यात येणार आहेत. या सुविधेसाठी संबंधित कंपन्यांना दरमहा द्यावी लागणारी खर्चाची रक्कम पुणे महानगरपालिका आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या खात्यातून थेट संबंधित कंपन्यांना वळती करण्याच्या प्रणालीला काल मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडनं अवजड  उद्योग मंत्रालयाकडं एक हजार बसेसची मागणी केली आहे. यात नऊ मीटरच्या २०० आणि १२ मीटरच्या ८०० बसेस असतील.

**<u>वॉका-पीएमसेतु-कार्यशाळा</u>**

इंट्रो-

भारताच्या कौशल्य विकासाला दिशा देण्यासाठी पीएम-सेतु योजनेअंतर्गत, पुण्यात यशदा इथं उद्या एक उद्योग कार्यशाळा आयोजित करण्यात येत आहे. शासकीय तंत्र निकेतनांमध्ये उद्योगांच्या मदतीनं सुधारणा करुन त्यांना उद्योग-व्यवस्थापित संस्था बनविण्याच्या उद्देशानं ही कार्यशाळा होत आहे. त्याविषयीचा हा वृत्तांत माझ्या सहकारी संध्या खान यांच्याकडून...

स्क्रीप्ट-

पीएम सेतु म्हणजे म्हणजे प्रधानमंत्री स्किलिंग अँड एम्प्लॉयबिलिटी ट्रान्सफॉर्मेशन थ्रू अपग्रेडेड ITIs ही योजना विकसित भारताच्या दृष्टीकोनाशी सुसंगत असून,भविष्यासाठी सज्ज आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक मनुष्यबळ घडविणे, उद्योग क्षेत्राचा या योजनेत सहभाग वाढवणे तसंच जनजागृती करणे हे या योजनेचं उद्दिष्ट आहे. या कार्यशाळेत बांधकाम, वस्त्रोद्योग, ऑटोमोबाईल, FMCG, इलेक्ट्रॉनिक्स, तेल आणि वायू तसंच नवीकरणीय ऊर्जा अशा विविध क्षेत्रांतील ५० हून अधिक कंपन्या सहभागी होणार आहेत.

PM-SETU अंतर्गत देशभरातील १,००० शासकीय ITI चे आधुनिकीकरण हब-अँड-स्पोक मॉडेलद्वारे करण्यात येणार आहे. यामध्ये २०० हब ITI ना प्रगत पायाभूत सुविधा आणि आधुनिक प्रशिक्षण साधनांसाठी सहाय्य दिले जाईल, तर ८०० स्पोक ITI जिल्हास्तरावर प्रशिक्षणाचा विस्तार करतील. या योजनेअंतर्गत ITI या शासकीय मालकीच्या पण उद्योग-व्यवस्थापित संस्था म्हणून विकसित केल्या जाणार आहेत. या सल्लामसलतीचा भाग म्हणून, उद्योग आणि संस्थांमधील भागीदारीसाठी सामंजस्य करार करण्यात येणार आहेत. संस्थात्मक प्रशासन मजबूत करणे, प्रशिक्षण परिसंस्थेचे आधुनिकीकरण आणि कौशल्यांचा कामगार बाजाराच्या मागणीशी मेळ घालणे या माध्यमातून ही योजना विकसित भारत घडविण्यासाठी भारतातील युवकांना सज्ज करण्यात महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

गाळशास्त्र-परिषद-मक्षी-संध्या

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या भूविज्ञान विभागातर्फे भारतीय गाळशास्त्र संघटनेची एकेचाळिसावी वार्षिक परिषद आणि दख्खन ज्वालामुखी क्रियांचा अवसादन, स्तररचना, हवामान आणि विवर्तनिकीवरील परिणाम या विषयावरील राष्ट्रीय परिषदेचं आयोजन करण्यात आलं आहे. या परिषदेचा उद्घाटन समारंभ उद्या भूविज्ञान विभागाच्या सभागृहात होणार आहे.

**Ngenपोस्टऑफिस**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरातील गणेशखिंड पोस्ट ऑफिस इथं भारत सरकारच्या टपाल सेवांच्या आधुनिकीकरण उपक्रमांतर्गत 'नेक्स्ट जनरेशन पोस्ट ऑफिस' चं आज उद्घाटन होत आहे. विद्यापीठ परिसरातच अत्याधुनिक आणि तंत्रज्ञानसुसंगत टपाल सेवा उपलब्ध करून देणारा हा उपक्रम विद्यापीठाच्या पायाभूत सुविधांमध्ये भर घालणारा ठरणार आहे.या पोस्ट ऑफिसमध्ये डिजिटल सेवा, जलद सेवा वितरण, मोफत वाय-फाय, मोबाईल चार्जिंग सुविधा, मिनी लायब्ररी तसेच आरामदायी प्रतीक्षागृहाची व्यवस्था करण्यात आली आहे.IIT मुंबईनंतर महाराष्ट्रातील दुसरे नेक्स्ट जनरेशन पोस्ट ऑफिस सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरात साकारत आहे.

**पीफ**

मराठी चित्रपट पुढे जावेत आणि प्रेक्षकांनी अधिकाधिक पाठिंबा द्यावा, यासाठी महाराष्ट्र शासन सर्वतोपरी काम करीत असून, नागपूर आणि नाशिक इथं चित्रनगरी उभारण्याची प्रक्रिया सुरू असल्याचं महाराष्ट्र चित्रपट आणि सांस्कृतिक रंगभूमी विकास प्राधिकरणाचे सह व्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजनीकर यांनी काल पुण्यात सांगितलं. पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये 'चित्रपट परिसंस्था', या विषयावर आयोजित चर्चेमध्ये साजनीकर बोलत होते. महाराष्ट्र शासनाचं चित्रपट धोरण लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचंही ते म्हणाले.

आसामी आणि इस्रायली आंतरराष्ट्रीय सहनिर्मिती असलेला 'मर्डर्स टू क्लोज – लव्ह टू फार' हा चित्रपट काल पिफमध्ये 'ग्लोबल सिनेमा' विभागात कलाकारांच्या उपस्थितीत दाखविण्यात आला. आसामच्या दिग्दर्शिका मंजू बोरा आणि इस्रायलचे दिग्दर्शक डॅन वोलमन यांनी त्याचं दिग्दर्शन केलं आहे. सत्ता आणि स्त्रिया यांच्या संघर्षाची कहाणी या चित्रपटात मांडण्यात आली आहे.

**लष्कर**

ऑपरेशन सागर बंधूचा एक भाग म्हणून, भारतीय लष्कराच्या अभियंत्यांनी श्रीलंकेतील एका महामार्गावर १२० फूट लांबीचा तिसरा बेली पूल यशस्वीरित्या बांधला आहे. यापूर्वी जाफना आणि कँडी प्रदेशात दोन बेली पूल सुरू केल्यानंतर ही कामगिरी साधण्यात आली आहे. मध्य प्रांतात असलेला हा पूल कँडी आणि नुवारा एलिया जिल्ह्यांना पुन्हा जोडणार आहे. 'दितवा' चक्रीवादळामुळं झालेल्या विध्वंसानंतर एका महिन्याहून अधिक काळ विस्कळीत झालेला हा संपर्क पूर्ववत झाला आहे. भारतीय लष्करानं शेजारी राष्ट्रासाठी अभियांत्रिकी कौशल्य आणि साधनांचा केलेला वापर नैसर्गिक आपत्तीच्या काळात सहकार्य आणि एकजुटीची भावना अधोरेखित करणारा आहे.

**क्रिकेट**

भारत आणि न्यूझीलंड दरम्यान ५० षटकांच्या मालिकेतील निर्णायक तिसरा सामना आज इंदूरमधील होळकर मैदानावर आज होणार आहे. पहिला सामना भारतानं जिंकला तर न्यूझीलंडनं दुसरा सामना जिंकून मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली. पन्नास षटकांच्या सामन्यांच्या १९८९ मधील उभय देशांतील भारतातील पहिल्या मालिकेपासून आजतागायत, न्यूझीलंडला यजमानांविरुद्ध मालिका विजय नोंदवता आलेला नाही.

**हवामान**

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहील असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**